अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १४६ । मंगळवार १० मार्च २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## दुसरी गॅस टाकी बुक करण्यासाठी २५ दिवसांची अट!




पेट्रोलियम मंत्रालयाने तीन दिवसांपूर्वीच एलपीजी सिलेंडर बुकिंगचा कालावधी १५ दिवसांवरून २१ दिवस केला होता. आता तो आणखी वाढवून २५ दिवस करण्यात आला आहे. म्हणजेच ग्राहकांना दोन सिलेंडर बुकिंगच्या दरम्यान किमान २४ दिवसांचे अंतर ठेवावे लागेल. म्हणजे जर तुम्ही १ तारखेला शेवटचा बुक केला असेल तर आता तुम्हाला २५ तारखेआधी सिलिंडर बुक करता येणार नाही. सध्या घरगुती गॅस, डिझेल किंवा पेट्रोलचा कोणताही तुटवडा नाही. मात्र साठेबाजीला आळा घालण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे पेट्रोलियम मंत्रालयाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. मात्र या निर्णयाचा फटका थेट सर्वसामान्य जनतेला बसणार आहे

## नवीन ऑटो रिक्षा परवाने देण्यास आजपासून स्थगिती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** वाढती वाहतूक कोंडी, व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी आज ९ मार्चपासून राज्यभर नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्यात येत आहे, असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. तथापि, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर नवीन परवाने द्यावेत, या संदर्भात निर्णय घेतला जाईल, त्यानूसार पुढील निर्णय घेतला जाणार आहे. अलसेही सरनाईक यांनी सांगितले.

मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्रातील ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य सरकारकडे असल्याचे भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. त्या स्थानिक परीस्थिती नूसार महाराष्ट्र शासनाला याबाबत निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे. परिवहन मंत्री या नात्याने यांनी या संदर्भात केंद्र सरकारकडे केलेल्या पत्रव्यवहारानंतर केंद्राने कार्यालयीन **(पान ४ वर..)**

# हुंडाबंदी कायदा अधिक कडक करणार

## राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांची ग्वाही

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** गेल्या काही वर्षात राज्यात घडलेल्या हुंडाबळी प्रकरणांचा मुद्दा सोमवारी विधानसभेत चांगलाच गाजला.



यावेळी लग्नाळू तरुणांना मुली मिळत नसल्याचा मुद्दाही चर्चेत आला. दरम्यान, सभागृहात सदस्यांनी मांडलेल्या व्यथेसंदर्भात विचार करून हुंडाबळी कायदा अधिक कडक करण्यासंदर्भात विचार करण्यात येईल अशी ग्वाही राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली .

आ. ज्योती गायकवाड यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे हुंडाबळीच्या घटनांचा मुद्दा उपस्थित केला. त्या म्हणाल्या की, अलीकडे हुंडाबळीच्या घटना वाढल्या असून पुरोगामी महाराष्ट्रात या घटना धक्कादायक आहेत. एनसीआरपीच्या अहवालानुसार, देशात प्रत्येक दिवशी २० मुलींचा हुंडाबळीमध्ये मृत्यू होतो. या प्रकरणातील मुलींसाठी मोफत वसतीगृह आणि शिक्षित मुलींसाठी नोकऱ्या तसेच अशिक्षित मुलींसाठी मोफत प्रशिक्षण उपलब्ध करून देणार का? हुंडाबळी प्रकरणात कठोर शिक्षा दिली जाणार का? असा प्रश्न त्यांनी विचारला. विधानसभा सदस्य नमिता मुंदडा, स्नेहा दुबे, प्रकाश सोळंके विक्रम पाचपूते, डॉ. नितीन राऊत यांनी या चर्चेत सहभाग घेतला. यावर उत्तर देताना राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले की, केंद्र शासनाच्या हुंडा प्रतिबंधक अधिनियम १९६१ च्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यात महिला व बालविकास विभागाच्या दि. ३ नोव्हेंबर २००३ च्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र हुंडा प्रतिबंधित नियम २००३ तयार करण्यात आला. राज्यस्तर, जिल्हास्तर आणि तालुका स्तरावर हुंडा प्रतिबंधक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच महिला व **(पान ४ वर..)**

### हुंडाबळी गुन्ह्यांची वाढती संख्या

**राज्यस्तरावर २०२१ मध्ये हुंडा बळी प्रकरणी १७२ गुन्हे दाखल करण्यात आले तर, ५३४ आरोपींना अटक करण्यात आली. २०२२ मध्ये १८० गुन्हे आणि ५१५ आरोपींना अटक, २०२३ मध्ये १७० गुन्हे आणि ३८१ आरोपींना अटक, २०२४ मध्ये १३९ गुन्हे आणि २३४ आरोपींना अटक तर, २०२५ मध्ये १३८ गुन्हे आणि २१३ आरोपींना अटक करण्यात आली.**



# विखे समर्थक सुभाष लोंढे स्थायी सभापतीपदी बिनविरोध

## अहिल्यानगर महापालिकेच्या सभेत निवड जाहीर होणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महापालिकेच्या स्थायी समिती सभापती पदासाठी भाजपचे सुभाष लोंढे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) दिपाली नितीन बारस्कर व उपसभापती पदासाठी भाजपच्या वर्षा रोहन सानप यांचे अर्ज दाखल करण्याच्या मुदतीत एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस व भाजप यांच्या युतीमध्ये स्थायी समितीचे सभापतीपद भाजपकडे तर महिला व बालकल्याण समितीचे सभापती पद राष्ट्रवादीकडे असे वाटप झालेले आहे. सुभाष लोंढे हे भाजपमधील विखे समर्थक म्हणून ओळखले जातात. निवडणुकीपूर्वी काहीच दिवस आधी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला व त्यांची लगेच सभापतीपदी वर्णी लागली. त्यामुळे भाजपमधील निष्ठावंतांच्या भुवया उंचावल्या आहेत. यापूर्वीही त्यांची एकत्रित शिवसेनेकडून सभापती म्हणून निवड झाली होती. सुभाष लोंढे हे पहेलवान आहेत. अर्थात या तिन्ही पदांसाठी उद्या, मंगळवारी पिठासन अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली निवड सभा होत आहे. या निवड सभेत या तिघांचीही बिनविरोध निवड जाहीर केली जाईल.


या तिन्ही पदांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची आज, सायंकाळपर्यंत अंतिम मुदत होती. या मुदतीत एकमेव अर्ज दाखल झाल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली. स्थायी समिती सभापती पदाच्या उमेदवारीसाठी **(पान ४ वर..)**

**महापालिकेत राष्ट्रवादी व भाजप यांच्या युतीने निर्विवाद वर्चस्व प्राप्त केले आहे. त्यामुळे महापौर उपमहापौर यांच्यासह सभापती व उपसभापती पदाच्या निवडी बिनविरोध होत आहेत. महापौर व उपमहापौर यांच्याप्रमाणेच स्थायी समिती सभापती तसेच महिला व बालकल्याण समितीच्या सभापती व उपसभापती पदाचा कार्यकालही सव्वा वर्षाचा असण्याची शक्यता आहे.**

## राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे स्वागत



महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती झालेले तेलंगणाचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे सोमवार दि. ९ रोजी पत्नी सुधा देव वर्मा यांचेसह मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी राज्य शासनाच्या वतीने त्यांचे स्वागत केले.



मला बाहेर काढा, मी तुमचे पैसे देतो

## ग्रोमोर आरोपी भूपेंद्रची विनवणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** ग्रोमोर कंपनीत ज्यांनी ज्यांनी पैसै गुंतवले आहे त्यांचे सर्वाचे पैसे मी परत करतो अशी आर्त विनवणी या घोटाळ्याचा मुख्य सुत्रधार आरोपी भूपेंद्र राजाराम सावळे याने केली आहे. ग्रोमोर घोटाळ्याच्या आरोपातून करोडो रुपयांच्या फसवणूक प्रकरणी भूपेंद्र सध्या नंदुरबार जेलची हवा खात आहे. आरोपीचे वकील ॲड बि ए हुसळे त्याच्या संपर्कात असून त्याची बाजू मांडणे कामी व्ही सी व्दारे किंवा प्रत्यक्ष भेटी गाठी सुरु आहेत.

नुकतीच त्यांनी नंदूरबार जेल मध्ये जात भूपेंद्र शी संवाद साधला यावेळी भूपेंद्र काहीसा नाराज असल्याचा दिसत होता. त्याचे कारणही तसेच आहे. तो त्याचे वकीलांशी बोलताना म्हणाला की, मी सर्व ठेवीदारांचे रक्कमा देण्यास तयार असून त्या जबाबदारी पासून मी किंचीत हटलेलो नाही त्या करीता मी बाहेर येणे गरजेचे आहे. तरच ठेवीदारांना त्यांच्या रक्कमा मिळू शकतात. त्यासाठी ठेवीदारांनी सकारात्मक भूमीका घेतल्यास मी लवकरात लवकर बाहेर पडण्यास मदत होईल. मात्र ठेविदारांकडून तशी सकारात्मकता दिसत नसल्याने सध्या तरी भूपेंद्र बाहेर पडण्याचे सर्व मार्ग बंद आहेत. दरम्यान आम्ही त्याला दोन ते तीन महिन्याच्या आत बाहेर काढण्यास प्रयत्नशील असल्याचे त्याचे वकील बि ए हूसळे यांनी सांगितले.

# ५० लाखांच्या विम्यासाठी अपघाती मृत्यूचा बनाव

## पोलीस अन् डॉक्टरही मॅनेज; ९ जणांना अटक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जळगाव :** जिल्ह्याच्या चाळीसगाव तालुक्यातील दहिवद फाट्यावर दुचाकीस्वाराचा अपघात होऊन मृत्यू झाल्याचा बनाव करून ५० लाख रुपयांचा विमा मिळवण्याचा कट उघडकीस आला आहे. या प्रकरणात मृताच्या कुटुंबीयांसह चाळीसगाव ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी आणि मेहुनबारे पोलिस ठाण्यातील चार पोलिस कर्मचाऱ्यांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विमा अधिकाऱ्याच्या सतर्कतेमुळे हा पिच्चरटाईप बनाव उघडकीस आला अन् सरकारी अधिकाऱ्यांची बोगसगिरी उघडी पडली.

खासगी विमा कंपनीच्या अधिकाऱ्याने पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, राजेंद्र शालिंदर जाधव यांच्या कथित अपघाती मृत्यूबाबत श्रीराम जनरल इन्शुरन्स कंपनीकडे ५० लाख रुपयांच्या पर्सनल एक्सीडेंट विम्याचा दावा पत्नी अरुणा जाधव यांनी केला होता. दावा करताना १९ एप्रिल २०२५ रोजी रात्री दहिवद येथून मालेगावकडे जात असताना मोटरसायकलला काळ्या रंगाच्या थार वाहनाने धडक दिल्याने जाधव जखमी होऊन चाळीसगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले होते.

यावेळी चाळीसगाव ग्रामीण येथील डॉक्टरांनी कुठलाही मृतदेह समोर नसताना, पोलिसांनप्राथमिक अहवालसह पोस्टमार्टम रिपोर्ट दिला होता. त्यानंतर याप्रकरणी मेहुनबारे पोलिस ठाण्यात एफआयआर क्र. ८६/२०२५ अशी नोंदही करण्यात आली होती. मात्र विमा कंपनीने या विमा प्रकरणाची चौकशी केल्यानंतर,त्यात अनेक विसंगती आढळल्या. तपासात राजेंद्र जाधव यांचा प्रत्यक्ष मृत्यू २३ फेब्रुवारी २०२४ रोजी यकृताच्या गंभीर आजाराने झाल्याचे समोर आले. चौकशीदरम्यान त्यांच्या घरात लावलेल्या फोटोवरही मृत्यूची तारीख २३ फेब्रुवारी २०२४ अशी नमूद असल्याचे आढळले. तसेच ग्रामपंचायत मृत्यू नोंदणी रजिस्टरमध्येही त्यांची नोंद नसल्याचे माहिती अधिकारातून स्पष्ट झाले. याशिवाय मृताच्या कागदपत्रांमध्ये वेगवेगळे पत्ते असल्याचे तसेच त्यांच्या नावावर इतर सुमारे १० विमा कंपन्यांकडूनही पॉलिसी घेण्यात आल्याचे समोर आले. यावरून अपघात व मृत्यूची संपूर्ण बनावट प्रकरण तयार करून विमा रक्कम मिळवण्याचा कट रचल्याचे स्पष्ट झाले.



### ९ आरोपींना अटक

दरम्यान, या प्रकरणात अरुणा राजेंद्र जाधव, संभाजी जाधव, थार वाहनाचा चालक-मालक, चाळीसगाव ग्रामीण रुग्णालयातील तत्कालीन वैद्यकीय अधिकारी मंदार करंबळेकर तसेच मेहुनबारे आणि चाळीसगाव पोलिस ठाण्यातील पोलीस कर्मचारी महेंद्र पाटील, सुनील निकम, रवींद्र बत्तीसे, सचिन निकम, तसेच विमा एजंट प्रवीण पाटील, प्रेम पाटील आणि मयताचा भाऊ मिथुन जाधव यांच्यावर विविध कलमान्वये गुन्हा **(पान ४ वर..)**

## महत्त्वाचे..



### टी-२० वर्ल्ड कप जिंकल्यानंतरही कॅप्टन सूर्या आयसीसी टीममधून 'आउट'

मुंबई : भारताला वर्ल्ड कप विजेता कॅप्टन झाल्यानंतरही सूर्याला आयसीसी टीममध्ये जागा मिळालेली नाही. टी-२० वर्ल्ड कप फायनलच्या २४ तासांमध्येच आयसीसीने यंदाच्या टी-२० वर्ल्ड कपची टीम जाहीर केली आहे, या टीममध्ये सूर्याला कॅप्टन्सीच काय पण टीममधूनही बाहेर ठेवण्यात आले. यंदाच्या टी-२० वर्ल्ड कपमध्ये सूर्यकुमार यादवची कामगिरी निराशाजनक झाली. फायनलमध्ये सूर्या पहिल्याच बॉलला शून्य रनवर आऊट झाला, त्यामुळे सूर्याला आयसीसीच्या टीममध्ये स्थान मिळालेलं नाही. आयसीसीच्या या टी-२० वर्ल्ड कप टीममध्ये भारताच्या ४ खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. तर दक्षिण आफ्रिकेच्या एडन मार्करमकडे आयसीसीच्या टीमचं नेतृत्व देण्यात आलं आहे. आयसीसीची टी-२० वर्ल्ड कपची टीम : एडन मार्करम (कर्णधार), साहिबजादा फरहान, संजू सॅमसन, इशान किशन, हार्दिक पांड्या, विल जॅक्स, जेसन होल्डर, जसप्रीत बुमराह, लुंगी एनगिडी, आदिल रशीद, ब्लेसिंग मुझरबानी, शॅडली श्वालक्किक.

## आरटीई प्रवेशासाठीची 'एक किलोमीटर' अट स्थगित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नागपूर :** आरटीई प्रवेशासाठी लागू करण्यात आलेल्या राज्य सरकारच्या एक किमीच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. सरकारच्या नव्या नियमानुसार आरटीई अंतर्गत प्रवेशासाठी विद्यार्थाच्या निवासस्थानापासून १ किलोमीटर परिसरातील शाळाच निवडता येत होती. सरकारच्या या निर्णयाला ॲड. बोधी रामटेके आणि ॲड दीपक चटप यांनी आव्हान देत नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. याच याचिकेवर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

**राज्य सरकारला उच्च न्यायालयाचा दणका**

आरटीई कायद्याअंतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये वंचित आणि दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्यासाठी २५ टक्के जागा राखीव ठेवल्या जातात. याच विषयाची याचिका सामाजिक कार्यकर्ते आशिष फुलझेले, **(पान ४ वर..)**


# गॅस टंचाईमुळे २० टक्के हॉटेल्स बंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या इराण-इस्रायल-अमेरिका संघर्षाचा परिणाम आता भारतातील हॉटेल उद्योगावरही दिसू लागला आहे. इराण-इस्रायल-अमेरिका संघर्षामुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाला असून मुंबईतील जवळपास २० टक्के हॉटेल्स बंद ठेवण्यात आली आहेत, अशी माहिती आहार (असोसिएशन ऑफ हॉटेल्स अँड रेस्टॉरंट मुंबई) या संघटनेने दिली आहे.

हा तुटवडा तुटवडा कायम राहिल्यास येत्या तीन दिवसात ५० टक्के हॉटेल्स बंद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षामुळे गॅस पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे देशभरात आणि राज्यातही गॅसचा तुटवडा जाणवू लागला आहे. मुंबईत हॉटेल व्यवसाय मोठ्या प्रमाणावर एलपीजी आणि कमर्शियल गॅसवर अवलंबून असल्याने या तुटवड्याचा थेट



परिणाम हॉटेल उद्योगावर होत आहे.

या समस्येबाबत आहार संघटना केंद्रीय पेट्रोलियम मंत्र्यांशी संवाद साधत आहे. तसेच राज्यातील अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची मंगळवारी संघटनेचे प्रतिनिधी भेट घेणार असून गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली जाणार आहे.

दरम्यान, गॅसच्या तुटवड्याचा फटका इतर शहरांनाही बसत आहे. बंगळुरू हॉटेल असोसिएशननेही मंगळवारपासून काही हॉटेल्स बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती समोर आली आहे. गॅसचा पुरेसा पुरवठा होत नसल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर गॅसचा पुरवठा लवकर सुरळीत झाला नाही, तर देशातील हॉटेल उद्योगासमोर मोठे संकट उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षाचे चटके आता महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांना बसू लागले आहेत. कतारने द्रवीकृत नैसर्गिक वायू अर्थात एलएनजीचं उत्पादन थांबवल्याने, भारताला होणारा पुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उद्योगधंदे गॅसवर गेले. छ. संभाजीनगरमध्ये एलएनजीच्या तुटवड्याचा अनेक उद्योगांना फटका बसला असून, एलएनजीअभावी ५ मोठ्या उद्योगांचं उत्पादन ठप्प झालं आहे. एमआयडीसीमधील आणखी उद्योग ठप्प होण्याची शक्यता आहे.

### छत्रपती संभाजीनगरमधील उद्योग ठप्प

ऑटो इंडस्ट्री, फार्मा कंपन्यांना एलएनजी तुटवड्याचा मोठा फटका बसत आहे. एमआयडीसीला दररोज २५० ते ३०० मेट्रिक टन एलएनजीची गरज आहे. मात्र युद्धामुळे तो विस्कळीत झाला. दरम्यान शेंद्रा, वाळूज, चिखलठाण्यातही ऑटोमोबाईललाही गॅस तुटवड्याचा फटका बसत आहे. याशिवाय एलएनजीच्या तुटवड्यामुळे स्टील कंपनीत युनिट बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.


### तीन दिवसांत ५० टक्के हॉटेल्स बंद होण्याची शक्यता

गॅसचा तुटवडा आणखी काही दिवस कायम राहिल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. पुढील तीन दिवसही गॅस पुरवठा सुरळीत झाला नाही, तर मुंबईतील सुमारे ५० टक्के हॉटेल्स बंद करण्याची वेळ येऊ शकते, असा इशारा आहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## 'ब्रह्मोस'चा जगात डंका!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**भारताकडून इंडोनेशिया खरेदी करणार ब्राह्मोस क्षेपणास्त्र**




**नवी दिल्ली :** भारताला सर्वाधिक शस्त्रांची आयात करणारा देश म्हणून आधी ओळखलं जायचं. मात्र, आता हे चित्र काहीसं बदलल्याचं दिसत आहे. भारताने विकसित शस्त्रांची निर्यात वाढवल्याचं दिसून येत आहे. कारण आता इंडोनेशिया भारताकडून ब्राह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करणार आहे. भारत आणि इंडोनेशियामध्ये २०० ते ३५० दशलक्ष डॉलर्सच्या दरम्यान ब्राह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करण्याच्या करारावर शिक्कामोर्तब झालं आहे.

भारत आणि इंडोनेशियामध्ये ब्रह्मोस क्षेपणास्त्र करारावर शिक्कामोर्तब झालं असून इंडोनेशियाच्या संरक्षण मंत्रालयाने या कराराची माहिती दिल्याचं वृत्त रॉयटर्सने दिलं आहे. दरम्यान, भारत आणि रशियाच्या संयुक्त उपक्रमाच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या ब्रह्मोस क्षेपणास्त्र खरेदी करण्यासाठी २०२३ मध्ये इंडोनेशियाकडून चर्चा सुरू झाल्या होत्या. दरम्यान, याआधी २०२२ मध्ये फिलिपिन्ससोबतही पहिला ब्रह्मोस क्षेपणास्त्राचा विदेशी करार झाला होता. **(पान ४ वर..)**

## संपादकीय...

# गदारोळ नको रचनात्मक चर्चा व्हावी!

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सोमवारपासून सुरू होत असतानाच, राजकीय वातावरण तापलेले दिसते. पहिल्या टप्प्यात विरोधी पक्षांनी आक्रम क भूमिका घेतल्याने सत्ताधाऱ्यांना काही प्रमाणात माघार घ्यावी लागली. आता दुसऱ्या टप्प्यातही हा गदारोळ कायम राहण्याची शक्यता आहे. लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधातील अविश्वास प्रस्तावाची चर्चा, राहुल गांधींविरोधातील विशेष प्रस्ताव, इराण–अमेरिका युद्धासंदर्भातील भारताची भूमिका आणि आगामी विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराचा प्रभाव – हे मुद्दे संसदेच्या कामकाजाला दिशा देणार आहेत. मात्र, प्रश्न हा आहे की हे अधिवेशन राष्ट्रीय मुद्द्यांवर रचनात्मक चर्चा करेल की राजकीय आरोप–प्रत्यारोपांच्या भोवऱ्यात अडकून पडेल?

पहिल्या टप्प्यात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलू न देण्याच्या आरोपाने मोठा गोंधळ उडाला. काँग्रेसने यावरून लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला. हा प्रस्ताव सोमवारी चर्चेला येणार आहे. सत्ताधारी एनडीए आघाडीकडे बहुमत असल्याने हा प्रस्ताव फेटाळला जाईल, हे स्पष्ट आहे. तरीही, या निमित्ताने दोन्ही बाजूंनी युक्तिवाद होतील आणि प्रमुख नेत्यांना भाषण करण्याची संधी मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिर्ला यांच्या मतदारसंघात भेट देऊन त्यांचे कौतुक केले आणि बांगलादेशच्या शपथविधीला त्यांना पाठवले. हे मोदींचे बिर्लांना दिलेले ठोस पाठबळ आहे. भाजपने सदस्यांसाठी व्हीप काढल्याने बिर्ला निश्चिंत आहेत. मात्र, या प्रस्तावाच्या चर्चेत सभागृहाचे नियम, लोकशाही मूल्ये आणि पक्षीय राजकारण यांचा संघर्ष समोर येईल. विरोधकांना हा मुद्दा सत्ताधाऱ्यांच्या 'एकाधिकारशाही'चा पुरावा म्हणून सादर करण्याची संधी आहे, तर सत्ताधाऱ्यांना विरोधकांच्या 'अनावश्यक गोंधळा'चा आरोप करण्याची.

राहुल गांधींनी चीनच्या लडाख घुसखोरीचा मुद्दा उपस्थित करत माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांच्या पुस्तकातील उतारे वाचण्याचा प्रयत्न केला. केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पुस्तक प्रकाशित नसल्याचा युक्तिवाद केला आणि बिर्लांनी तो मान्य केला. यावरून भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी राहुल गांधींविरोधात विशेष प्रस्ताव आणला, ज्यात त्यांची खासदारकी रद्द करण्याची मागणी आहे. बिर्लांविरोधातील प्रस्ताव फेटाळल्यानंतर हा प्रस्ताव चर्चेला येऊ शकतो. नरवणे यांनी एका मुलाखतीत आपली बाजू स्पष्ट केली, तरीही हा मुद्दा दुसऱ्या टप्प्यात पुन्हा उफाळून येईल. चीन घुसखोरीचा विषय अजूनही जिवंत आहे. विरोधकांना हा राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा म्हणून केंद्र सरकारला घेरण्याची संधी आहे. मात्र, सभागृहात असे उतारे वाचणे हा अपमान आहे की अभिव्यक्ती स्वातंत्र्य, यावरून वाद घडेल. हे दाखवते की संसदेत राष्ट्रीय मुद्देही राजकीय हिशेबात अडकतात.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इराण–अमेरिका युद्धासंदर्भातील भारताची भूमिका. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात कर वाढवले आणि रशियाकडून कच्चे तेल विकत घेण्यावर अटकाव केला. भारताने ट्रम्प यांचे म्हणणे मान्य केले, तरीही आयात कर कमी करण्यावर बोलणी थांबली आहेत. इराणविरोधातील युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किंमती वाढल्या, ज्याची झळ भारताला बसत आहे. एलपीजी गॅसच्या दरवाढीने सामान्य माणूस त्रस्त आहे. अमेरिकेने भारताला रशियाकडून तेल विकत घेण्याची 'परवानगी' दिली, हा शब्द विरोधकांना खटकला. काँग्रेसने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. संसदेत हा मुद्दा गाजेल, कारण भारताला 'परवानगी' घेण्याची गरज नाही, असे सरकार म्हणते. तरीही विरोधक स्पष्टीकरण मागतील. इराण युद्धात भारताचे मौन हे अप्रत्यक्षपणे अमेरिका–इस्रायलला पाठिंबा आहे, असा आरोप काँग्रेसच्या सोनिया गांधी यांनी लेखात केला. मोदींची इस्रायल भेट आणि इराण नौकेच्या उद्ध्वस्त होण्यावर भारताची प्रतिक्रिया नसणे, हे मुद्दे उपस्थित होतील. केंद्रीय परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांना यावर उत्तर द्यावे लागेल. 'रायसिना डायलॉग'मध्ये त्यांनी हा मुद्दा गंभीर नसल्याचे सांगितले, ज्यावर विरोधक आक्रमक होतील. हे दाखवते की आंतरराष्ट्रीय संबंध हेही संसदेत राजकीय हत्यार बनतात.

अधिवेशनात अनुदानित मागण्या आणि वित्त विधेयकावर चर्चा होणे अपेक्षित आहे. पहिल्या टप्प्यात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अर्थसंकल्पावरील चर्चा झाली, तरी राहुल गांधींच्या भाषणाचे सावट होते. मोदी लोकसभेत आले नाहीत, कारण बिर्लांनी सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला. आता दुसऱ्या टप्प्यात मोदी येतील तेव्हा वातावरण कसे असेल? विरोधक गोंधळ घालतील तर विधेयके चर्चेविना संमत होऊ शकतील. केंद्राने कोणती महत्त्वाची विधेयके आणणार, हे स्पष्ट नाही. मात्र, विरोधक केंद्राला अडचणीत टाकणारे मुद्दे उपस्थित करतील.

यात भर म्हणजे आगामी विधानसभा निवडणुका. केंद्रीय निवडणूक आयोग पश्चिम बंगाल, केरळ, तमिळनाडू, पाँडिचेरी आणि आसामच्या निवडणुकांच्या तारखा लवकरच जाहीर करेल. अधिवेशन सुरू असतानाच प्रचार सुरू होईल. सत्ताधारी सदस्यांचे लक्ष प्रचाराकडे वळेल. अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात संसदेपेक्षा राज्यातील राजकारणाला प्राधान्य मिळेल. हे संसदेच्या कामकाजासाठी हानिकारक आहे. निवडणुकांच्या धामधुमीत राष्ट्रीय मुद्दे दुर्लक्षित होतात.

एकूणच, हे अधिवेशन राजकीय गदारोळात अडकले तर सामान्य जनतेच्या समस्या – महागाई, बेरोजगारी, राष्ट्रीय सुरक्षा – दुर्लक्षित राहतील. संसद ही चर्चेची जागा आहे, न की राजकीय कुस्तीची. दोन्ही पक्षांनी रचनात्मक भूमिका घेतली तरच हे अधिवेशन यशस्वी होईल. अन्यथा, 'संसदेपेक्षा प्रचारच' ही म्हण खरी ठरेल.

# महिला दिनानिमित्त श्रीरामपुरात साडी वॉकेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** जागतिक महिला दिनानिमित्त श्रीरामपूर सायकलिंग क्लबच्या महिला सदस्यांच्या वतीने शहरात ३ किलोमीटर अंतराची साडी वॉकेथॉन आयोजित करण्यात आली. घरातील स्त्री निरोगी असेल तर संपूर्ण कुटुंब निरोगी राहते हा संदेश देत आयोजित केलेल्या या उपक्रमाला शहरातील महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वॉकेथॉनमध्ये ३८० हून अधिक महिलांनी सहभाग नोंदविला.

महिलांनी दैनंदिन घरकामाबरोबरच स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष द्यावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. साडी परिधान करून महिलांनी उत्साहात पायी चालत आरोग्याबाबत जागरूकतेचा संदेश दिला.

या वॉकेथॉनचे वैशिष्ट्य म्हणजे मोठ्या स्पर्धांमध्ये वापरली जाणारी क्यूआर ट्रॅकिंग प्रणाली. क्लबचे सदस्य इंजि. हर्षद महाजन यांनी ही प्रणाली विकसित करून स्पर्धेचे नियोजन सुलभ केले. स्पर्धेत ६ ते १५ वर्षे वयोगटातील ३९, १६ ते ६० वर्षे वयोगटातील ३०० आणि ६० वर्षांवरील ३० महिलांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्लबच्या सदस्या डॉ. कावेरी मांडण यांनी झुंबा सत्र घेतले. त्यानंतर प्रतिभा नाडकर व स्वाती शहा यांनी झेंडा दाखवून वॉकेथॉनची सुरुवात केली. उत्कृष्ट साडी वेशभूषेसाठी विविध वयोगटांमध्ये आकर्षक बक्षिसे देण्यात आली. ६ ते १५ वयोगटात श्रीशा ननावरे, १६ ते ६० वयोगटात नलिनी कुटे, पूनम सोनी व निर्मला चंदन, तर ६० वर्षांवरील गटात डॉ. सरिता देशपांडे यांचा सन्मान करण्यात आला. सहभागी सर्व महिलांना पदक देऊन गौरविण्यात आले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. संकेत मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली क्लबच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमादरम्यान शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला. शेवटी आभार नम्रता मुंदडा यांनी मानले.

## नगरपरिषदेच्या वतीने लवकरच आधार अपडेट सेंटर : नगराध्यक्ष संधान

कोपरगाव : कोपरगाव शहरातील



नागरिकांना आधार कार्ड संबंधित कामांसाठी होणारी गैरसोय लक्षात घेऊन कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने लवकरच आधार अपडेट सेंटर सुरू करण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिली आहे. या निर्णयामुळे शहरातील नागरिकांना आधार कार्डमधील विविध बदल व अद्ययावत करण्याची सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे.नागरिकांच्या मागणी आणि तक्रारी येत होत्या त्यावर निर्णय घेत पालिकेने कार्यवाही केली आहे. सध्या आधार कार्डमध्ये नाव, पत्ता, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक किंवा बायोमेट्रिक अद्ययावत करण्यासाठी नागरिकांना दूरच्या केंद्रांवर जावे लागते. त्यामुळे नागरिकांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाढत होता ही अडचण लक्षात घेऊन नगरपरिषदेने पुढाकार घेत आधार अपडेट सेंटर सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. नगराध्यक्ष पराग संधान यांनी सांगितले की, नगरपरिषदेच्या इमारतीत हे केंद्र सुरू करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली आहे.

# वारी येथे 'महिला शक्ती'च्या हस्ते पाणपोईचे लोकार्पण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

कोपरगाव : भीषण उन्हाळ्याची चाहूल लागताच तहानलेल्या वाटसरूंना दिलासा देण्यासाठी वारी (ता. कोपरगाव) येथे मोफत पाणपोईचा शुभारंभ रविवारी (दि. ८) करण्यात आला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून राहुल (दादा) मधुकरराव टेके चॅरिटेबल ट्रस्ट व राहुल (दादा) मित्र मंडळाच्या वतीने भरतवाडी परिसरात सलग तिसऱ्या वर्षी हा उपक्रम राबविण्यात आला.

विशेष म्हणजे समाजाच्या आरोग्यासाठी कार्य करणाऱ्या अंगणवाडी व आशा सेविकांच्या हस्ते पाणपोईचे लोकार्पण करून स्त्रीशक्तीचा सन्मान करण्यात आला. भरतवाडी परिसरातील श्री रोकडोबाबा व श्री गवळी बाबा देवस्थानच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ समाजसेविका स्मिता काबरा, अंगणवाडी सेविका अलका मेहेरे, सारिका भड, विशाखा भालेराव, तारामती टेके, वृषाली टेके तसेच आशा सेविका सुषमा कपाटे, रोहिणी लोखंडे, योगिता पवार, शितल गायकवाड, सविता वाघ, रंजना भड व सुषमा वाघ यांचा सन्मान करण्यात आला. राहुल (दादा) मित्र मंडळातील महिला स्वयंसेविकांचाही गौरव करण्यात आला. उन्हाळ्यात वारी परिसरातून जाणाऱ्या नागरिकांची, शाळकरी मुलांची व मजुरांची तहान भागावी या उद्देशाने ट्रस्टकडून गेल्या तीन वर्षांपासून हा उपक्रम राबविला जात आहे. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित महिलांना अल्पोपहार देण्यात आला. या उपक्रमामुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून ट्रस्टच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक होत आहे.



# 'हॉरिझन' राज्यस्तरीय स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त : मंजुश्री मुरकुटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अशोकनगर :** विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्याला आणि बौद्धिक क्षमतेला वाव देण्यासाठी तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यस्तरीय स्पर्धा अत्यंत उपयुक्त ठरतात, असे प्रतिपादन अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी अधिकारी व नगरसेविका मंजुश्री मुरकुटे यांनी केले.

अशोकनगर येथील अशोक पॉलिटेक्निक, इंजिनिअरिंग व फार्मसी कॉलेजमध्ये आयोजित 'हॉरिझन' राज्यस्तरीय स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात त्या बोलत होत्या. लोकनेते माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत पोस्टर प्रेझेंटेशन, लेथवर्क प्रेझेंटेशन, प्रश्नमंजुषा, ब्रिज मेकिंग तसेच ऑनलाईन गेमिंग अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. राज्यातील विविध महाविद्यालयांमधील सुमारे ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

पुढे बोलताना मुरकुटे म्हणाल्या की, अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपले तांत्रिक




ज्ञान, सादरीकरण कौशल्य आणि संशोधन दृष्टिकोन मांडण्याची संधी मिळते. विचारांची देवाणघेवाण आणि स्पर्धेतील चुरस यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मंजुश्री मुरकुटे, प्राचार्य अंजाबापू शिंदे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अरुण कडू, प्रा. विशाल घोगरे, डॉ. वर्षा पुजारी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# संजीवनी फार्मसीच्या ईरम अन्सारीच्या संशोधनाची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** संजीवनी एम.फार्मसीची विद्यार्थीनी ईरम तजमुलहक्क अन्सारी हिने 'संजीवनी ॲडवर्स ड्रग रिॲक्शन रिपोर्टिंग सिस्टिम' संबंधित चॅटबॉट आधारित प्रणाली या विषयावर संशोधनात्मक पोस्टर सादर केले. या पोस्टरच्या माध्यमातून तीला 'अन्वेशन' या आंतरराष्ट्रीय संशोधनात्मक पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळाली. तीने तयार केलेल्या या प्रणालीचे कॉपीराईट नोंदणी केली असुन पेटंट प्रकाशन प्राप्त झाले. भविष्यात सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या उन्नतीसाठी ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे. संजीवनी फार्मसी मध्ये संशोधनपूरक वातावरण असल्याने येथील विद्यार्थी संशोधन क्षेत्रात उत्तम कामगिरी करीत आहेत.

ईरम अन्सारी हिने तयार केलेल्या पोस्टरला यापूर्वी महाविद्यालय, विभागीय, विद्यापीठ आणि राज्यस्तरीय




'अविष्कार' पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत यश मिळाले. त्याचा परिणाम म्हणून तीला आता आंतरराष्ट्रीय व्यासपिठावर आपले संशोधन मांडण्याची संधी मिळाली. संस्थेच्या दृष्टीने ही भुषणावह बाब आहे. संजीवनी फार्मसी महाविद्यालयात केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकार्याने अत्याधुनिक संशोधन प्रयोगशाळा कार्यरत आहे. विद्यार्थी व प्राध्यापकांना त्यामुळे संशोधन करणे सुकर होते. त्यांना संशोधन करण्याची प्रेरणा मिळते.

# मक्का विजय : - कोणावर हीं सूड उगविण्यात येणार नाही.. सार्वजनिक माफी चा दिवस

**रमजान मुबारक २०२६**
**रोजा नं. २० वा,**
**मंगळवार**
**दिनांक १०-०३-२०२६**

आज २० रमजान, इस्लामी इतिहासातील सर्वात अतुलनीय अभूतपूर्व व आठवणीच्या हिंदोळ्याचा खास दिवस. अर्थात रक्त हीन क्रांती चा मदिना विजय.. सार्वजनिक माफी चा दिवस.

दिव्य कुर आन सांगतो, जर त्यांनी शांती घडवून आणण्याची इच्छा दाखवली तर, तुम्हीं देखील त्यांच्याशी शांती प्रस्थापित करा, अल्लाह ( ईश्वरा ) वर भरोसा ठेवा. खरोखर ! तोच सर्व काही ऐकणारा व सर्व काही जाणणारा आहे. ( अल - अन फाल आ. नं. ६१). आणि! ते जर त्यांनी(शांती स्थापीत करण्याचे नाटक करून ) धोका (फसवायचे) देण्याचे उद्देश बाळगून असतील तर, निश्चितच अल्लाह ( परमेश्वर ) तुमच्या साठी पुरेसा आहे. अल - अनफाल आ. नं. ६२).

हजरत मुहम्मद स्व. यांचा जन्म इसवी ५७० मध्ये कुरेश काबील्यात झाला, सरासरी १२५० मैल लांब व ७५० मैल रुंद असा सुमारे १० लाख चौ. मैल, अर्थातच ३० लाख चौ. किलोमीटर क्षेत्रफळाचा भुभाग त्यामध्ये ९०% भाग हा वाळवंटाचा, भारतासारखीच तिन्ही बाजूने समुद्री किनारा, याच भागात एका पट्ट्यात सुपीक पट्टा, अन , याच पट्ट्यात पवित्र मक्का व मदिना ही शहरे, वाळवंटी भागामुळे येथील जीवन मान भटकंती चे होते, मेंढपाळ, व्यापार, लूटमार, हें येथील प्रमुख व्यवसाय, त्यातच येथे थोडयाशा गोष्टीं मधून रक्त रणजित संघर्ष, संपूर्ण अराजक्त परिस्थिती, चोरी डकैती, लूटमार, खून खराबी येथील रोजचाच, दारू, झुगार चुकीच्या रितिरिवाज , परंपरा चालीरिती वेगवेगळ्या, स्त्री फक्त भोगवीलासासाठी, नाच गाणं, वेश्या व्यवसाय, मुली जन्मला आल्याबरोबर मुलींना त्या जन्म दात्या बाप स्वतः त्या जिवंत मुलींना पुरून शेखी मिरवत .भयानक परिस्थिती, एवढ्या अराजक्त परिस्थितीत अल्लाह नें ५७० मध्ये हजरत मुहम्मद स्व. यांचा जन्म झाला, जसे जसे वाढत तसे अल्लाह ( परमेश्वर ) त्यांना विकसित करीत होते.. त्यांना वयाच्या चाळीसव्या (४०) वर्षी.. पैगंबर -प्रेषितत्व अर्थात अल्लाह चा संदेश वाहक , अल्लाह संदेश वार्ता जगात सर्व विश्वासाठी सांगणारा.

प्रेषित मुहम्मद स्व.लहानपणापासून पुरोगामी -परिवर्तन वादी मताचेच होते, पैगंबर =(संदेशवाहक ) झाल्या नंतर त्यांच्या कामाने परिवर्तन ला वेग आला, त्यांनी एकेश्वर वादाची अर्थात जगात एकच अल्लाह ( परमेश्वर - भगवंत ) आहेत. अरब समाज मनात असंख्य देव देवता मानणारा व पूजा करणारा समाज होता प्रत्येक दिवसाचा एक देव असें ३६५ मुर्त्या, पुन्हा प्रत्येक काबील्या वेग वेगळेच देव, असा काहीतरी विचित्र व अघोरीं वेगवेगळे प्रकार त्या अरब जगतात निर्माण झाले होतें अंधश्रद्धा तर शिगेला पोहचली , त्या वेगवेगळ्या देवदेवतांचे वेगवेगळं नवस भोग असं विचित्र प्रकार , यामुळे संपूर्ण अरब प्रदेश अतिशय मागास, म्हणून त्यामध्ये काहीतरी सुधारणा व्हावी म्हणून परमेश्वर ( अल्लाह ) चा , संदेश देण्यासाठी दिवस रात्री मेहनत घेत होते.. ही परिवर्तन नांदी ची चाहूल होती यामुळे जुन्या सर्व प्रथा,रितरिवाज, परंपरा, प्रथा बंद होऊन नवीन पुरोगामी पद्धत येऊन मानवी कल्याणस काहीतरी चांगले होण्याची सुरुवात प्रेषित मुहम्मद स्वनीं केली होती, त्यांच्या या परिवर्तन वादी चळवळीस बरेच समविचारी मित्रांनी साथ देण्यास सुरुवात केली, परिवर्तनाची सुरुवात चांगल्या रीतीने पुढे जातं होती, कोणतेही परिवर्तन हें लवकर कधीच होत नसते ती हळू हळू निरंतर होणारी असतं व त्या मध्ये अगदीच टोकाचा विरोध होणं सहजकीच असते, म्हणून तेथील तथाकठीत सरमजामशाही वादी मंडळी नें अतोनात विरोधाला सुरुवात केली, जागोजागी छळ, त्रास देत होते, सरंमजाम शाही वादयानी तीन वर्षे आर्थिक -सामाजिक -बहिष्कार टाकून त्यांच्या व त्यांना मानणाऱ्या मित्रपरिवाराला तीन वर्षे आर्थिक सामाजिक बहिष्कारानें खूप त्रास दिला गेला, त्या सर्वांनी अतोनात छळ ११ वर्षे सहन केलेत, याला काहीतरी सीमा असतात परंतु त्रासाची सीमा ही जीवावर आली पैगंबरांना जीवे मारण्याचा कट कारस्थान करण्यात आले. शेवटी अल्लाह चा आदेशानुसार दिनांक १६ जुलै ६२२ रोजी मक्का सोडून मदिना येथे स्थलांनस्तर करण्यात आले. अर्थात



लेखक
**डॉ. सलीम शाईदा सिकंदर शेख**
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना
श्रीरामपूर, जिल्हा :- अहमदनगर
मोबाईल ९२७१६४००१४.

हिजरत करण्यात आली.

मदिना व आसपासच्या हजारो किलोमीटर च्या परिसर तसेच जवळच असलेल्या आफ्रिकन देशा पर्यंत इस्लाम चा मानवता वादी प्रसार - प्रचार जोरात चालूच होता. हें पुरोगामी परिवर्तन बघून पैगंबर व सहकारी मित्र यांच्या आचार -विचार व जीवन शैली बघून हजारोच्या संख्येनें रोज लोंढेचे लोंढे येऊन इस्लाम धर्म स्वीकारात होते. बंधूनची प्रगती उन्नती उत्साह बघून तेथील बंधूना ही मक्का वासिय अरब त्रास देत होते, मधल्या काळात किरकोळ कारणावरून लढाया, रक्त रंजित खुनी संघर्ष सतत चालूच, त्यामधीच काही प्रसिद्ध लढाया प्रसिद्ध आहेत, याचं प्रमाण फार जास्तच झालं होतं. प्रत्येक गोष्टीचा अतिरेक झाला म्हणून याला कुठेतरी आळा घातला पाहिजे , म्हणून यावर तोडगा म्हणजे परस्पर समझोता -( तह -) हुदैबिया या गावात - सुलाह हुदैबिया म्हणून जगतात प्रसिद्ध आहेत. सुलाह -हुदैबिया समझोत्याची मर्यादा १० (दहा )वर्षाची ठेवण्यात आली होती, दोन्हीही बाजूच्या बऱ्याच अटी शर्ती ना मान्यता देण्यात आली होती, विरोधी मक्कावासियांनी जास्त प्रमाणात जाचक अटी घातल्या होत्या , येवढ्या जाचक अटी असूनही प्रेषित मुहम्मद स्व यांनी शांततेसाठी - अजून जास्त रक्त - सांडू नाहीं यासाठीच आपल्या सहकारी मित्राच्या नाराजी ओढावून ही मान्य केला. ( अटी शर्ती मोठया आहेत असो ).

थोड्याच काळात , दोन - अडीच वर्षांमध्येच मक्कावासियांनी शांतता करार - समझोता उल्लंघन करण्यास सुरुवात केली. वारंवार या कराराचे उललंघन होत होते, कुठपर्यंत त्रास सहन करायचे, याची परिसिमा गाठली, शेवटी अतिरेक झाला म्हणून, पैगंबर मुहम्मद स्व. नी मक्का कूच करण्याचा आदेश ( दिनांक २३-डिसेंबर ६२९ ) १० रमजान ८ हिजरी.ला काढून , दहा( १०) दिवसात कोणतीही खबर इकडे तिकडे पोहचणार नाहीत हीं बातमी गुप्त ठेवता , आपल्या दहा हजार सैनिक व लष्करी ताफया सह दहा दिवसाचा प्रवास करून (दिनांक २ जानेवारी ६३० रोजी ) हिजरी तारीख २० रमजान ०८, सकाळी मक्का शहरात पोहचले. मक्कातील प्रत्येक नागरिक अचानक झालेलं हें चित्र बघून अक्षरशा भांबवून सैरा -वैरा पळत सुटला, कोणालाच काही कळत नव्हतं, काय करावं ते. कारण मक्कावासियांना माहित होते,त्यांनीच स्वतः वर हीं वेळ आणली होती, आपल्या पूर्वज. लोकांनी प्रेषित मुहम्मद स्व.च्या अनुयायीनां , मित्रांनां, सहकाऱ्यांना किती अतोनात त्रास दिला- छळ केला - खुनी व रक्त रंजित संघर्ष केला या जणींवेतून, आपण केलेल्या पापाची जाणीव असल्यामुळे जीव मुठीत घेऊन जीव वाचवीत कुठं लपायला जागा भेटते ते शोधत होते, लहान मोठे अगदीच धस्तावलेलं होते, याला इलाज काहीच नव्हता. कारण केलेल्या पूर्व कृत्याना या जगात माफी तर नाही व मिळणारच नव्हती व माफिच्या लायक ही नव्हतं.

वैर, एवढ्या छळ -हाल -अपेष्ठा, देणाऱ्या एका काळातील वैरी मक्कातील प्रत्येक नागरिक हा सजा देण्याच्या लायकीचा असताना हीं मक्का विजयाच्या दिवशी पैगंबर मुहम्मद स्व. नीं प्रत्येकाला प्रत्येकाचे नावं घेऊ घेऊ याला माफी, त्याला माफी, तुला माफी, तुमच्या सर्व कुटुंबाला हीं माफी.

कारण आज पैगंबर मुहम्मद व त्यांच्या सहकाऱ्यांना बदला घेण्याचा बदल्याचा दिवस होता, अतोनात यातना त्रास छळ ज्यांनी केला त्या सर्वांना शिक्षा करण्याचा दिवस होता.

एका युद्धात पैगंबर मुहम्मद स.चे आवडते चुलते हजरत हमजा रजि. हें पैगंबर मुहम्मद स. नां प्रत्येक गोष्टीमध्ये तन मन धनाने साथ - मदत करायचे. एकदम प्रिय चुलते हजरत हमजा रजि. ना एका महत्वाच्या युद्धात वीरगती प्राप्त झाल्यानंतर विरोधी मक्का सरदार अबू सुफियान ची पत्नी हिंदा नें हमजा रजि. चे काळीज काढून खाल्लं व दोन्ही कान कापून आपल्या गळ्यात माळ घातली होती. अशा निर्दयी कौर्य करणाऱ्यांना माफी मिळणे तर अश्यक्य कोटीतीलच. तिला व तिच्याशी संपर्क असणाऱ्या सर्वांना फाशी होणार होणार होणं गरजेचं असताना.

ज्या चुलती हिंदा हिने प्रिय चुलते अबू हमजा रजि. यांचे काळीज खाल्लं व कानाचा गळ्यात हार घातला होता अशा क्रूर कर्म करणारी चुलती हिंदा . . मक्का विजयाच्या दिवशी हिंदा आपली ओळख पटू नयेत म्हणून आपलं तोंड झाकून क्षमा दानात आली होती परंतु पैगंबर मुहम्मद यांनी तिला ओळखलं आणि आपल्या प्रिय चुलत्याची आठवण काढून रडत रडत म्हणाले आज हिंदा आज तुलाही माफी माफी.

मक्के च्या काबागृहा जवळच घोषणा केली कीं आज कोणावरही सूड उगवला जाणार नाहीं... कोणाची ही हत्या करण्यात येणार नाहीं. कोणाचाही बदला घेण्यात येणार नाहीं.. जें आप आपल्या घरात लपून बसलेले आहेत त्यांना ही माफी. यावर , अगोदर कुणाला ही विश्वास बसला नाहीं व बसत ही नव्हता कारण त्यांनी केलेल्या क्रूर कर्मा ची शिक्षा ही फाशीच होतं होती,...परुंतु झाले उलटंच.

त्या घडीला पैगंबर मुहम्मद स्व. यांच्या कडे लष्करी ताकत, सर्वभौम सत्ता - अफाट साम्राज्य - संपत्ती - व सर्व गोष्टी युक्त होते त्यांना कोणीही रोखू शकत नव्हतं. एवढं सर्व परिस्थिती असून सुद्धा , बदला घेण्याचा दिवस असून हीं त्या बदल्यात आपल्या दुश्मनांना एवढे मोठ-मोठ्ठाल्ले पापी कृत्याच्या बदल्यात माफी... सार्वजनिक माफी...

तो दिवस होता २० वां रमजान रोजा ०८ ( आठ) हिजरी. इसवी सन होतं २ जानेवारी ६३०... आणि आज २० वीस रमजान रोजा हिजरी १४४७. तारीख १०-मार्च २०२६ मंगळवार..!

जो: सर्व शक्ती शाली असूनही : बदल्याची भावना ठेवत नाहीं.. तोच खरा.. शक्तिशाली श्रद्धांवान ( बंधू ).. त्यालाच अल्लाह पसंद करतात. पैगंबर मुहम्मद स्व..

# अंभोरे ओझर येथील आदिवासी बांधवांचा शिवसेनेत प्रवेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील अंभोरे व ओझर येथील सुमारे ३५ ते ४० आदिवासी बंधू-भगिनींनी जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना महायुतीत प्रवेश केला. या प्रवेशामुळे तालुक्यात आ. खताळ यांच्या नेतृत्वाला बळ मिळाल्याचे चित्र दिसून आले. अंभोरे येथील आदिवासी समाज यापूर्वी काँग्रेस पक्षाशी संबंधित होता.



मात्र माजी लोकप्रतिनिधींबाबत नाराजी व्यक्त करत या समाजातील कार्यकर्त्यांनी आमदार अमोल खताळ यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत शिवसेना महायुतीचा भगवा हाती घेतला. सुरजित खेमनर, कोंडाजी कडनर, संतोष बलसाने, मंजाबापू साळवे व राम बर्डे यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्त्यांनी पक्षप्रवेश केला. यामध्ये लक्ष्मण जाधव, म्हातारबा बर्डे, भीमा बर्डे, शिवराम उघडे, जालिंदर मोटे, सुदाम माळी, नारायण गायकवाड, नामदेव बर्डे, विशाल गायकवाड यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले.

महिलांमधून लता पवार, ताराबाई बर्डे, अनिता बर्डे, सुनीता माळी, मथुरा गायकवाड, सुमन बर्डे, मंगल पिंपळे, तुळसाबाई जाधव, गंगुबाई पवार आदींनीही शिवसेना महायुतीत प्रवेश केला. यावेळी महिला उपजिल्हा प्रमुख दिपाली वाव्हळ यांच्या हस्ते महिलांचा सत्कार करण्यात आला, तर पुरुष कार्यकर्त्यांचा आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते भगवी शाल देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी आ खताळ म्हणाले, सर्वसामान्य जनतेच्या प्रेमामुळेच मला या मतदारसंघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. नागरिकांनी आपल्या समस्या मोकळेपणाने मांडाव्यात. त्या सोडविण्यासाठी आपण कटिबद्ध असून शासनाच्या लोककल्याणकारी योजना प्रत्येक गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करू.

आतापर्यंत आमच्या आदिवासी समाजाचा केवळ मतांसाठी वापर झाला. मात्र आमच्या प्रश्नांकडे लक्ष दिले गेले नाही. शिवसेना महायुतीचे सरकारच आमचे प्रश्न सोडवू शकते, या विश्वासाने आम्ही पक्षप्रवेश केला, असे आदिवासी नेते लक्ष्मण जाधव यांनी सांगितले.

---

द•ख•ल

## इन्फंट जीझस चर्च मैदानावर जागतिक महिला दिन उत्साहात



**श्रीरामपूर** : येथील सिस्टर्सच्या वतीने इन्फंट जीझस चर्च मैदानावर ७ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात परिसरातील विविध गावांमधील महिला बचत गटांच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. अष्टगाव, निर्मळ पिंपरी, राजुरी, कोल्हार, तिसगाव, ढवळे वस्ती, प्रवरानगर, बाभळेश्वर व दूध डेअरी परिसरातील महिलांनी या सोहळ्यास उत्स्फूर्त उपस्थिती लावली. सकाळी ११.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. वैशाली म्हस्के उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना आरोग्य, शिक्षण व स्वावलंबनाचे महत्त्व पटवून दिले. मुंबई येथील ऑक्झिलिअम डेव्हलपमेंट ऑफिसच्या प्रभारी सिस्टर मनिषा परमार यांनी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमात रेव्हरंड फादर मायकल वाघमारे, सिस्टर कॅथरीन परेरा, सिस्टर स्टेला रिबेरो व सिस्टर अगाथा फर्नांडिस उपस्थित होत्या. कार्यक्रमात महिलांसाठी विविध खेळ व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. शेवटी सिस्टर कॅथरीन परेरा यांनी आभार मानले.

## भंडारा निमित्ताने भगवान विश्वकर्मा मंदिरात आरती



**नेवासा** : मासिक आमटी-भाकरी भंडारा उपक्रमाच्या निमित्ताने नेवासा येथील भगवान विश्वकर्मा मंदिरामध्ये आयोजित आमटी भाकरी भंडारा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी आरती करून उपस्थित भाविकांना आमटी भाकरीच्या भंडारा महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.दर महिन्याला भाकरी भंडारा महाप्रसादाचा हा उपक्रम महंत भास्करगिरी महाराज व महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या प्रेरणेने येथे राबवला जातो.यावेळी त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील शिक्षक नागोराव लाहोरकर व प्रीती लाहोरकर व संजय देऊळकर व मंगलाताई देऊळकर यांच्या हस्ते भगवान विश्वकर्मा महाराजांच्या मूर्तीचे पूजन करून आरती करण्यात आली. आरती प्रसंगी अकोला येथील पत्रकार संजय देऊळकर, भगवान विश्वकर्मा मंदिर देवस्थानचे अध्यक्ष इंजिनियर सुनीलराव वाघ, बबनराव राजे,राजेंद्र परदेशी,बाबासाहेब मोरे,मच्छिंद्र गव्हाणे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिंदू एकता आंदोलन पक्षाकडून शिवजयंती उत्साहात




**श्रीरामपूर** : तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवजयंतीनिमित्त शुक्रवार, दि. ६ मार्च रोजी हिंदू एकता आंदोलन पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून विविध उपक्रम राबविण्यात आले. बेलापूर रोडवरील महावीर कॉम्प्लेक्ससमोर झालेल्या कार्यक्रमात श्रीरामपूरचे आमदार हेमंत ओगले, नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष करण ससाणे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी कर्मचारी संघटनेचे संजय भोंडवे, बापुसाहेब सरोदे, गोरक्षनाथ साबदे आदी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी देशासाठी सेवा बजावलेल्या लष्करी अधिकारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल, पुष्पगुच्छ व मिठाई देऊन सन्मान करण्यात आला. आमदार हेमंत ओगले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर मार्गदर्शन केले. शिवजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, वर्तमानपत्र हॉकर्सना पिशव्या तसेच चर्मकार व्यावसायिकांना छत्र्यांचे वाटप यांसारखे उपक्रम पक्षाने यापूर्वीही राबविले आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शहराध्यक्ष मंगेश छतवाणी, जिल्हाध्यक्ष मनोहर बागुल, उपाध्यक्ष बी. एम. पवार, विजय जगताप, शिवाजी फोफसे आदींनी परिश्रम घेतले.

---

## संगमनेरात रंगपंचमी उत्साहात साजरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : शहरासह तालुक्यात रंगपंचमीचा सण मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. शहरातील चौकाचौकांत लहानांपासून तरुण-तरुणींपर्यंत सर्वांनी रंगांची उधळण करत हा रंगोत्सव आनंदाने साजरा केला. सर्वत्र गुलाल, रंग आणि पाण्याच्या उधळणीमुळे वातावरण रंगमय झाले होते.

सकाळपासूनच शहरातील विविध भागांत तरुणाईने एकत्र येऊन रंग पंचमीचा आनंद लुटला. मित्रमंडळी एकमेकांना रंग लावत हॅपी रंगपंचमीच्या शुभेच्छा देत जल्लोष करताना दिसत होते. अनेक ठिकाणी रंगांची उधळण, पाण्याच्या फुग्यांची बरसात आणि पिचकाऱ्यांमधून रंगांची उधळण करण्यात आली.शहरातील काही प्रमुख चौकांमध्ये विशेष व्यवस्था करून पाण्याचे शॉवर



लावण्यात आले होते. डीजेच्या तालावर तरुण-तरुणी नाचत रंगपंचमी साजरी करत होते. गाण्यांच्या सुमधुर तालावर रंगांची उधळण करत तरुणाईने मोठ्या उत्साहात नृत्य सादर केले. यावेळी परिसरात आनंदी वातावरण निर्माण झाले होते.लहान मुलांनीही रंग, पिचकारी आणि फुग्यांच्या माध्यमातून रंगपंचमीचा आनंद घेतला. तर काही ठिकाणी मित्रपरिवार व नागरिकांनी एकत्र येत पारंपरिक पद्धतीने गुलाल लावून एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

## आत्मविश्वास हाच महिलांचा खरा दागिना : सौ.कोल्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : महिलांनी कोणत्याही परिस्थितीत खचून न जाता आत्मविश्वासाने पुढे जावे. आपला आत्मविश्वास हाच महिलांचा खरा दागिना असून संकटांवर मात करण्याची ताकद प्रत्येक स्त्रीमध्ये आहे, असे प्रतिपादन कोपरगावच्या माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांनी केले.

सरकार मान्यताप्राप्त नवक्रांती कौशल्य विकास प्रशिक्षण अॅकॅडमी, कोपरगाव यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त शिलाई मशीन व आरीवर्क प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन तसेच प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून स्नेहलताताई कोल्हे उपस्थित



होत्या. यावेळी त्यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात मतदारसंघातील विविध कर्तृत्ववान महिलांचा त्यांच्या हस्ते सत्कारही करण्यात आला.

यावेळी सहकार महर्षी कोल्हे कारखान्याचे संचालक रमेश घोडेराव, नवक्रांती संस्थेचे संस्थापक चंद्रकांत बागुल, राजश्री बागुल यांच्यासह अनेक मान्यवर व महिला भगिनी उपस्थित होत्या.स्नेहलताताई कोल्हे पुढे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांना जिजाऊंनी घडवले म्हणून स्वराज्याची निर्मिती झाली. प्रत्येक महापुरुषाच्या यशामागे स्त्रीशक्तीचा मोठा वाटा असतो. देशाच्या राष्ट्रपतीपदी द्रौपदी मुर्मू कार्यरत आहेत, तर अर्थमंत्री निर्मला सीतारामन देशाची आर्थिक धुरा सांभाळत आहेत. त्यामुळे महिलांनी आपण कोणापेक्षा कमी नाही, हा आत्मविश्वास बाळगावा.महिलांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष द्यावे व स्वतःवरही प्रेम करावे, असा सल्लाही त्यांनी दिला. बचतगट चळवळीमुळे महिलांमध्ये आर्थिक साक्षरता व आत्मविश्वास वाढला असून त्या आज स्वतःचे प्रश्न मांडून त्यांचे निराकरण करू लागल्या आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

---

## कोल्हे साखर कारखान्यात राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्यात ५५ वा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह शनिवारी साजरा करण्यांत आला. अध्यक्षस्थानी संचालक निवृत्ती बनकर होते.

प्रारंभी कारखान्याचे संस्थापक माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यांत आले. कार्यकारी संचालक श्री. सुहास यादव यांनी सुरक्षा ध्वज फडकवत उपस्थित कामगारांना सुरक्षेची शपथ दिली. ते पुढे म्हणाले की, संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे युवा अध्यक्ष विवेक भैय्या कोल्हे यांनी कामगारांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत कारखाना अंतर्गत उत्पादन, रासायनिक उपपदार्थ निर्माती, सहवीज, बायोगॅस,



इथेनॉल, अग्नीशमन आदी विभागासाठी दर्जेदार आधुनिक सुरक्षा उपकरणे घेवुन प्रशिक्षीत मनुष्यबळाच्या माध्यमांतुन कारखाना अंतर्गत निर्माण होणारे संभाव्य अपघात टाळले आहेत. राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह देशभरात ४ ते १० मार्च दरम्यान साजरा करून मानव निर्मित होणारे अपघात टाळण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात याचे मार्गदर्शन केले जाते. कारखाना कार्यक्षेत्रातील आसपासच्या गावातुन मोटारसायकलद्वारे कामावर येणा-या कामगारांना युवानेते विवेक कोल्हे यांनी मोफत सुरक्षा हेल्मेट दिले आहेत त्याचा सर्वांनी वापर करावा. कामाच्या ठिकाणी प्रत्येकांने सुरक्षा नियमांचे तंतोतंत पालन करावे जेणेकरून घरी वाट पाहणारेही काळजीत पडणार नाही. कामगार हा घटक उत्पादन विभागाची राष्ट्रीय संपत्ती आहे.याप्रसंगी संचालक बाळासाहेब वक्ते, ज्ञानेश्वर होन, साखर सरव्यवस्थापक शिवाजीराव दिवटे, सचिव विधीज्ञ तुळशीराम कानवडे, एच. आर. मॅनेजर विशाल वाजपेयी, यांच्यासह सर्व खातेप्रमुख, उपखातेप्रमुख, कामगार मोठया संख्येने उपस्थित होते.

## हातभट्ट्यांवर विदेशी दारू विक्रीचा धंदा तेजीत; प्रशासनाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील विविध गावांमध्ये सुरू असलेल्या हातभट्ट्यांवर गावठी दारूबरोबरच चक्क विदेशी दारूचीही विक्री मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे समोर आले आहे.

तसेच परवाना नसलेल्या काही हॉटेल्समधूनही देशी व विदेशी दारूची बेकायदेशीर विक्री सुरू असल्याने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याचा आरोप तालुका लिकर्स, परमिट रूम व बार असोसिएशनचे अध्यक्ष नानासाहेब जोंधळे आणि सल्लागार सुनिल मुथा यांनी केला आहे.

राज्य शासनाने महसूल वाढीच्या उद्देशाने परमिट रूममधील मद्यविक्रीवर २५ टक्के जीएसटी लागू केला आहे. त्यामुळे परमिट रूममधील मद्य ग्राहकांना महाग पडत असल्याने ग्राहकांनी पर्यायी मार्ग शोधण्यास सुरुवात केली आहे. याचाच फायदा घेत तालुक्यातील काही हातभट्ट्यांवर विदेशी मद्य विक्रीचा गोरखधंदा सुरू झाला आहे. तसेच काही परवाना नसलेल्या हॉटेल्समधूनही देशी-विदेशी दारूची विक्री केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.वाइन शॉपमधून विदेशी मद्य खरेदी करून ते थोड्या जास्त दराने हातभट्ट्या व बेकायदेशीर ठिकाणी विकले जात असल्याचे सांगितले जाते. परमिट रूमपेक्षा स्वस्त दरात मद्य मिळत असल्याने ग्राहकांची पावले आता परमिट रूमऐवजी या ठिकाणांकडे वळत आहेत. परिणामी अधिकृत परमिट रूम व हॉटेल व्यवसायिकांचे व्यवसाय अडचणीत आले असून अनेक जण आर्थिक संकटात सापडले आहेत.हा प्रकार उघडपणे सुरू असताना प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याने यामागे कोणाचे तरी आशिर्वाद असल्याची शंका व्यक्त होत आहे. या बेकायदेशीर मद्यविक्रीला तात्काळ आळा घालावा, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा जोंधळे व मुथा यांनी दिला आहे.

## श्रीरामपूर नगरपरिषद जलतरण तलाव नागरिकांसाठी खुला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर नगरपरिषदेच्या जलतरण तलावाचे नूतनीकरण पूर्ण झाल्यानंतर आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते तो नागरिकांसाठी खुला करण्यात आला. यावेळी बोलताना जलतरण तलावाच्या अधिक विकासासाठी आमदार निधीतून १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही आमदार ओगले यांनी दिली.

तत्कालीन नगराध्यक्ष व माजी आमदार स्व. जयंतराव ससाणे यांच्या दूरदृष्टीतून उभारण्यात आलेला हा जलतरण तलाव जिल्ह्यातील एक महत्त्वाची क्रीडा सुविधा असल्याचे सांगून आमदार ओगले म्हणाले की, या ठिकाणी आणखी सुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक निधी देण्यात येईल. शहराच्या विकासाबरोबरच खेळाची मैदाने आणि क्रीडा सुविधा उभारण्याकडे नगराध्यक्ष करण ससाणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष लक्ष दिल्याचेही त्यांनी नमूद केले.

नगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले की, राज्यात श्रीरामपूर नगरपरिषदेचा वेगळा नावलौकिक असून स्वच्छता, विकास आणि नागरिकांना आवश्यक असलेल्या भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. आमदार हेमंत ओगले यांच्या नेतृत्वाखाली शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर यांनी गेल्या अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या विविध सुविधा आणि परंपरा पुन्हा सुरू करण्याचे काम नगराध्यक्ष करण ससाणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी हाती घेतल्याचे सांगितले.

यावेळी माजी सभापती बाबासाहेब दिघे, ज्येष्ठ नगरसेवक दिलीप नागरे, दत्तात्रय सानप, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, महिला बालकल्याण समिती सभापती मंजूश्री मुरकुटे, गटनेत्या वैशाली चव्हाण, आरोग्य सभापती योगेश जाधव, शिवसेना नेते अशोक थोरे यांच्यासह अनेक नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते व पालिकेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## महिलांनी आरोग्याबाबत सजग राहणे काळाची गरज : डॉ. प्रेरणा शिंदे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : महिलांनी स्वतःच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक असून नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि सकारात्मक जीवनशैली अंगीकारल्यास अनेक आजारांपासून बचाव करता येतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रेरणा शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र कृषक समाज व अनुराधाताई आदिक मित्र मंडळाच्या वतीने रविवार (दि. ८ मार्च) रोजी, श्रीरामपूर येथे महिला दिनानिमित्त महिलांच्या आरोग्य



विषयक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अनुराधा आदिक यांनी स्वागतपर भाषणात सांगितले की, महिला सशक्तीकरणासाठी दरवर्षी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. नगरपरिषदेतील महिला सफाई कर्मचाऱ्यांसाठी दरवर्षी आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. तसेच महिला भगिनींसाठी अनेक सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात येतात. यावेळी बोलताना डॉ. शिंदे यांनी महिलांच्या आरोग्याशी संबंधित विविध मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता नियमित तपासण्या करून घ्याव्यात, व्यायामाची सवय लावावी आणि संतुलित आहार घेण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. समाज घडविण्यात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असून समाजातील सर्वाधिक विश्वास शिक्षकांवर असल्याचेही त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमास अनिताताई जोशी, वैशालीताई जोशी, अर्चनाताई पानसरे, सोनलताई मुथ्था, जयश्रीताई नवले, केतकीताई बनकर, निशा थोरात, शलाका आदिक तसेच महिला शिक्षक भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** : राहुरी तालुक्यातील श्री क्षेत्र धनेश्वर देवस्थान, धानोरे घाट येथे शिवजयंतीचे औचित्य साधून श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनारूपी पुतळ्याची प्रतिष्ठापना आणि 'शिवतीर्थ' अनावरण सोहळा अत्यंत अभूतपूर्व उत्साहात पार पडला. श्री क्षेत्र धनेश्वर देवस्थान समिती आणि धानोरे येथील समस्त ग्रामस्थांच्या वतीने या ऐतिहासिक सोहळ्याचे नेटके नियोजन करण्यात आले होते. ह्या शिवतीर्थाचे अनावरण महंत दत्तगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात महाराजांच्या मूर्तीला मंगलमय वातावरणात दुग्ध अभिषेक घालून करण्यात आली. ढोल-ताशांचा गजर आणि सनईच्या सुमधुर सुरांनी संपूर्ण धानोरे घाट परिसर शिवमय झाला होता.मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य महाआरती संपन्न झाली.

अनावरणावेळी आणि आरतीनंतर आकाशात करण्यात आलेल्या भव्य फटाक्यांच्या आतषबाजीने



उपस्थितांचे डोळे दिपवून टाकले.समस्त ग्रामस्थांनी या सोहळ्यात आपला सहभाग नोंदवला.या सोहळ्याची सांगता उपस्थित शिवभक्तांसाठी आयोजित महाप्रसादाने झाली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवतीर्थ व्यवस्थापन समिती, गावातील सर्व युवक मंडळे आणि धानोरे ग्रामस्थांनी अहोरात्र परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या शिवभक्तांच्या 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.

---

नेमलेली ता. १०/०४/२०२६,

ॲडव्होकेट श्री, एस.ए.पांडे,
निशाणी नं. ०८
दिनांक ०९/०३/२०२६

## जाहीर नोटीस

श्रीरामपुर येथील मे. १ ले सह दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर यांचे कोर्टात....

रे. मु. नं. ३३५/२०२५

श्री. अभय निवृत्ती कुलकर्णी, वय ५६ वर्ष, धंदा शेती,

रा. रामकृष्णनगर, गजानन महाराज मंदिरा जवळ, शिरसगांव, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर,-वादी

**विरूध्द**

१. श्री. रमेश निवृत्ती कुलकर्णी, वय ६० वर्ष, धंदा शेती, रा. एम.आय.टी. कॉलेज जवळ, गट नंबर ४, घर नंबर १०, मार्तंड नगर, सातारा परिसर, छत्रपती संभाजी नगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर...

२. श्री. अजय निवृत्ती कुलकर्णी, वय ५२ वर्ष, धंदा शेती, रा. धनलक्ष्मी पार्क, टाईप -A बिल्डींग, फ्लॅट नंबर ८, राईट भुसारी कॉलनी, पुणे रोड, जनसेवा बँके जवळ, कोथरूड, पुणे ४११०३८

३. अनुपमा सुनिल पाटील, वय ५५ वर्ष, धंदा घरकाम, रा. A-२०२ देवेश अपार्टमेंट रोड, कोपर रोड, अंबा भवाणी मंदिर, डोंबिवली वेस्ट व्ही.टी.सी. कल्याण पो. विष्णुनगर, ता. कल्याण जि. ठाणे.

**प्रतिवादी**

ज्याअर्थी वर नमुद दाव्यातील वादी व प्रतिवादी यांनी सदर दावा हर्षल नरेंद्र जोशी हा १० वर्षा पेक्षा जास्त कालावधी पासुन म्हणजेच दिनांक १५/०६/२०१६ पासुन श्रीरामपुर येथुन परागंदा झालेला असल्याने व त्याचा तेव्हा पासुन आजतागायत हरप्रकारे शोध घेवुनही कोणताही ठावठिकाणा मिळुन आलेला नसल्याने व तो जिवंत असलेबाबत कोणतीही शाश्वती राहीलेली नसल्याने त्याचा दिवाणी मृत्यु झाला आहे असा जाहीर ठराव होवुन मिळणेकामी व नमुद हर्षल नरेंद्र जोशी याचे मौजे उंदिरगांव, ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर येथील गट नंबर ४२८/२ पैकी क्षेत्र हे ०५-०५ आर व गट नंबर ३९७/२ पैकी क्षेत्र हे ०२-१९ आर या दोन्ही मिळकतीतील वारस हक्काने असलेल्या अविभक्त हिश्याचे क्षेत्रास वादी व प्रतिवादी हे नमुद हर्षल याचे कायदेशिर वारस आहेत असा जाहीर ठराव होवुन मिळणेकामी मा. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु हर्षल नरेंद्र जोशी हा मयत नसुन जिवंत असलेबाबत वा वादी व प्रतिवादी हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहीतगार वकिलांकरवी १ ले सह दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर श्रीरामपुर या मे, कोर्टात हजर होवुन योग्य त्या पुराव्यानिशी हरकत नोंदवावी अन्यथा पुढील आदेश केले जातील.

आज दि. ०९ माहे मार्च सन २०२६ रोजी माझे सहीनिशी व मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली,

**बेंच क्लार्क,**
**१ ले सह दिवाणी न्यायालय,**
**क स्तर श्रीरामपूर**

(शिक्का)

**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय,**
**क स्तर श्रीरामपूर**

---

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु एसआर/५६/२०२६
नेवासा दिनांक २३/०२/२०२६

अर्जदार श्री श्रीम-बाबासाहेब मधुकर बेल्हेकर, रा. गणेशवाडी, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कै.सटवाजी यादव बेल्हेकर, यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यू नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, मृत्यू नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै. सटवाजी यादव बेल्हेकर, गावाचे नाव-गणेशवाडी, मृत्यू दिनांक-१७/०७/२००२ करिता या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

(शिक्का)

**तहसिलसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

### आरटीई प्रवेशासाठीची ‘१ किलोमीटर’ अट स्थगित

अनिकेत कुत्तरमारे यांनीही केली होती. आज या दोन्ही याचिकांवर सुनावणी करत कोर्टाने सरकारच्या आरटीई प्रवेशाच्या १ किमी अटीला स्थगिती दिली. १ किलोमीटरची अट आरटीई कायद्यात कुठेही नाही. शिक्षण हक्क कायदा हा केंद्र सरकारचा आहे. त्यात राज्य सरकार सुधारणा करून एक किलोमीटरची अट लादणे म्हणजे एका हाताने अधिकार देऊन दुसऱ्या हाताने काढून घेण्यासारखं आहे, असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं आहे. दरम्यान, शिक्षण हक्क कायदा हा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांतील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतो. १ किमीची अट मनमानी, अवैध आणि संविधानविरोधी असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता पालकांना आपल्या मुलांसाठी कोणतीही शाळा निवडता येणार आहे. न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले जात आहे.

### ‘ब्रह्मोस’चा जगात डंका!

भारताने याआधी ब्राह्मोस क्षेपणास्त्राचा फिलिपिन्सबरोबरही करार केलेला आहे. फिलिपिन्सबरोबरचा करार म्हणजे भारताची आजवरची पहिली मोठी संरक्षण निर्यात ऑर्डर होती. फिलिपिन्सच्या राष्ट्रीय संरक्षण विभागाने ३७४.९६ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच २,७०० कोटी रुपयांच्या या कराराला मान्यता दिली होती.

### ५० लाखांच्या विम्यासाठी अपघाती मृत्यूचा बनाव

दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील नऊ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. या घटनेमुळे बनावट पद्धतीने विमा रक्कम मिळवून देणारी टोळी उघडकीस आली असून या प्रकरणात साधारणतः विविध विमा कंपन्यांकडून तब्बल साडेसात कोटी रुपयांची रक्कम हडपण्याचा प्रयत्न झाल्याचे देखील समोर आले आहे

### हुंडाबंदी कायदा अधिक कडक करणार

बालकांवरील अत्याचारांना प्रतिबंध घालण्यासाठी अपर पोलिस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली महिला व बाल अपराध प्रतिबंधक हा स्वतंत्र विभाग तयार करण्यात आला आहे. गृहविभागाच्या वतीने महिला हेल्पलाईन, भरोसा सेल, महिला दक्षता समिती, स्वतंत्र पोलिस तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. यासोबतच महिला व बालविकास विभागामार्फत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती तयार करण्यात आली आहे. याद्वारे हुंडापद्धती विरोधात जनजागृती करणे आणि कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांच्या संरक्षणाचे काम केले जाते. पण यासंदर्भातील जनजागृतीबाबत तरतूदी कमी असल्याने जनजागृतीची कामे मोठ्या प्रमाणात दिसून येत नाही. दि. २६ नोव्हेंबर हा दिवस हुंडा बंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. तसेच २६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर हा हुंडा बंदी सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. सर्व लोकप्रतिनिधींनी आपापल्या क्षेत्रात जनजागृती मोहिमेत पुढाकार घेतल्यास जनजागृती वाढेल आणि या प्रकरणांमध्ये घट होईल. ज्योती गायकवाड यांनी केलेल्या सूचनांची सरकार नोंद घेईल आणि यावर बैठक घेऊन उपाययोजना करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी आ. स्नेहा दुबे यांनी सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यात सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली. एखादे लग्न ठरल्यानंतर लग्नाच्या तारखेच्या तीन महिने आधी वर आणि वधू विभागांची नोंदणी करून संबंधित कुटुंबाच्या अकाऊंटवर वॉच ठेवणार का? कुणाच्या नावावर किती पैसे ट्रान्सफर झाले? कुणाच्या नावाने गाडी बुक झाली? आणि लग्नात देण्यात येणाऱ्या भेटींची एखाद्या यंत्रणेमार्फत नोंद ठेवणार का? असा प्रश्न त्यांनी विचारला. यावर या सूचना नोंदवून घेऊन त्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल, असे मंत्री भोयर यांनी सांगितले. तसेच लग्नाचा प्रसंग हा कौटुंबिक प्रसंग असतो. अशावेळी शासनाने तिथे विनापरवानगी जाऊन कारवाई करणे, यावर एकमत होणार नाही. तक्रार प्राप्त झाल्यास निश्चितपणे कारवाई करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

### नवीन ऑटो रिक्षा परवाने देण्यास आजपासून स्थगिती

स्मरणपत्राद्वारे ही माहिती दिली आहे. मोटार वाहन (दुरुस्ती) अधिनियम, २०१९ अंतर्गत राज्य सरकारांना वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी आवश्यक लवचिकता देण्यात आली असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे. मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम ६७ (३) नुसार राज्य सरकारांना प्रवासी व माल वाहतुकीसंदर्भातील परवाने बदलण्याचा तसेच विविध योजना राबविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या अधिकारांचा वापर करून राज्य सरकारांना लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी तसेच वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करता येणार असल्याचे केंद्राने स्पष्ट केले आहे. याबरोबरच सध्या अस्तित्वात असलेले ऑटो रिक्षा परवाने अनेक ठिकाणी एकाच घरात देण्यात आलेले आहेत, काही परवाने बांग्लादेशी नागरिकांना अवैध रितीने दिल्याच्या तक्रारी आमच्या कडे प्राप्त झाल्या आहेत. आता पर्यंत राज्यभरात सरसकट १४ लाखांपर्यंत ऑटो रिक्षा परवाने दिलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा परवान्यांबाबतचा विषय स्थानिक परिस्थिती आणि वाहतुकीच्या गरजेनुसार राज्य शासनाने योग्य पद्धतीने हाताळावा, असा सल्ला केंद्र सरकारने दिला आहे. राज्यातील नागरिकांना अधिक चांगली आणि सुलभ वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन लवकरच आवश्यक त्या धोरणात्मक निर्णयांवर विचार करणार आहे.

### विखे समर्थक सुभाष लोंढे स्थायी सभापतीपदी बिनविरोध

सुभाष लोंढे यांच्या अर्जावर नगरसेवक मनोज कोतकर सुचक आहेत तर निखिल वारे अनुमोदक आहेत. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदासाठी दिपाली बारस्कर यांच्या अर्जावर सुनिता किसन भिंगारदिवे यांचे सूचक म्हणून तर अनिता विपुल शेटीया अनुमोदक म्हणून आहेत. उपसभापती पदासाठी वर्षा सानप यांच्या उमेदवारी अर्जावर वंदना विलास ताठे सुचक तर रोशनी आकाश त्रंबके अनुमोदक आहेत. नगरसचिव मेहेर लहारे यांच्याकडे हे अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज दाखल करताना महापौर ज्योती गाडे, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्यासह भाजप व राष्ट्रवादीचे नगरसेवक उपस्थित होते.

# गावठी कट्टा बाळगणारा आरोपी जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**गंगापूर** : गंगापूर तालुक्यातील कायगाव शिवारात गावठी कट्टा बाळगून परिसरात दहशत माजवणाऱ्या एका इसमास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने जेरबंद केले. ही कारवाई शनिवारी (दि. ७ मार्च) छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. घरफोडी पथक गंगापूर परिसरात अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाईसाठी माहिती घेत असताना भेंडाळा फाटा येथे पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत यांना गोपनीय माहिती मिळाली. छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर मार्गावरील कायगाव शिवारातील रामेश्वर रसवंतीसमोर एक इसम गावठी कट्टा बाळगून फिरत असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ सापळा रचला. संशयित इसमास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव प्रविण विजयसिंग इंगळे (वय ३९) रा. वडणा ता. खामगाव जि. बुलढाणा, सध्या रा. वाळूज एमआयडीसी परिसर, छत्रपती संभाजीनगर असे सांगितले. पंचासमक्ष झडती घेतली असता त्याच्याकडून गावठी कट्टा, एक जिवंत काडतूस व मोबाईल फोन असा सुमारे २ लाख १ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस पुढील कारवाईसाठी गंगापूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले असून तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड व अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक विजयसिंग राजपूत व पथकाने केली.

# गावठाण हद्दीतील नागरिकांच्या ७/१२ नोंदीसाठी वंचित आघाडीचा मोर्चा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील तांदुळवाडी येथील नवीन गावठाण हद्दीत अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या जागांची महसुली नोंद ७/१२ उताऱ्यावर तातडीने करण्यात यावी, अन्यथा १२ मार्च रोजी तहसील कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष संतोष चोळके यांनी दिला. यासंदर्भात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सोमवारी तहसीलदार अमित पवार व पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तांदुळवाडी येथील नवीन गावठाण हद्दीत अनेक नागरिक ५० ते ६० वर्षांपासून घरे बांधून कुटुंबासह वास्तव्यास आहेत. त्या ठिकाणी वीज, पाणी यांसह मूलभूत सुविधा उपलब्ध असल्या तरी संबंधित जागांची महसुली नोंद अद्याप त्यांच्या नावावर ७/१२ उतारा किंवा हक्क नोंद करण्यात आलेली नाही. त्यामुळे घरकुल योजना व इतर शासकीय लाभ मिळविताना अडचणी निर्माण होत आहेत. या जागांची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून ग्राममहसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांमार्फत पंचनामा व अहवाल सादर करावा. पात्र नागरिकांच्या नावावर गावठाण ७/१२ उतारा व हक्क नोंद करून महसुली अभिलेखात नोंद करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनावर निसारभाई सय्यद, बाळासाहेब जाधव, नागेश जाधव, शितल आढाव, सागर जामकर, सिद्धार्थ साळवे, किरण गायकवाड, पप्पू शिंदे, अमजद पठाण आदींसह अनेकांच्या सह्या आहेत.

# आदिवासी लाभार्थ्यांना चारापिके बियाणे व कृषि निविष्ठा वाटप कार्यक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित चारापिके संशोधन प्रकल्प विभागाच्या आदिवासी उपयोजना अंतर्गत प्राप्त अनुदानातून मौजे पालीपाडा, ता. नवापूर, जि.नंदूरबार येथील आदिवासी शेतकऱ्यांना रब्बी हंगामात ओट व बरसीम या चारापिके बियाण्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये पीक वाढीनंतर आवश्यक असणारे मनुष्यचलित सायकल कोळपे, सुक्ष्म अन्नद्रव्ये-खख, मेटॅर्हायझिअम, कृषिदर्शनी व दुष्काळी व कमी पाण्याची आवश्यकता असणारे काटे विहरीत निवडूंग (कॅक्टस) पाने व नेपीअर ठोंबे या कृषि निविष्ठांचा समावेश होता. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांचे मार्गदर्शनाखाली संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमात वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश दोडके, चारा पैदासकार डॉ. लक्ष्मण तागड यांच्या नियोजनाखाली या योजनेतील शास्त्रज्ञ डॉ. योगेश सैदाणे, डॉ. संदिप लांडगे, कनिष्ठ संशोधन सहाय्यक दिपक पालवे, कृषि सहाय्यक सुहास भालेराव व कृषि विज्ञान केंद्र, नंदूरबार येथील शास्त्रज्ञ व समन्वयक योगेश पाडवी यांच्या उपस्थितीत विविध निविष्ठांचे ३० लाभार्थी आदिवासी शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. या प्रसंगी पालीपाडा व श्रावणी गावचे सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील तसेच प्रगतशिल शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता

### गयाबाई मुरकुटे



**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील कमालपूर येथील गयाबाई चांगदेव मुरकुटे ( वय ९९) यांचे वध्दापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले,एक मुलगी,सुना नातसुना नातवंडे पतवंडे असा मोठा परिवार किसनरांव ( तात्या) मुरकुटे यांच्या त्या भावजयी होत.

# ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेत कुकाण्याचा सर्वेश सदावर्ते राज्यात प्रथम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**भेंडा** : केवल फाउंडेशन, धाराशिव यांच्या वतीने शिवजन्मोत्सवा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या ५ व्या राज्यस्तरीय ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेत कुकाणा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता सातवीतील विद्यार्थी सर्वेश सचिन सदावर्ते याने खुल्या गटातून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. गेल्या ५ वर्षांपासून सातत्याने आयोजित होणाऱ्या य प्रतिष्ठेच्या स्पर्धेत संपूर्ण राज्यातून एकूण ६६ स्पर्धक सहभागी झाले होते. या सर्वांवर मात करत सर्वेशने आपल्या प्रभावी वक्तृत्वाने परीक्षकांची मने जिंकली आणि विजेतेपद मिळवले. केवल फाउंडेशनच्या वतीने त्याला २ हजार रुपये देऊन गौरविण्यात आले. सर्वेशला लहानपणापासूनच वाचन आणि वक्तृत्वाची आवड आहे. सार्वजनिक कार्यक्रमांत व्याख्याने देणे आणि महापुरुषांच्या जयंती उत्सवात सहभागी होऊन इतरांना वाचनासाठी प्रेरित करण्यात तो नेहमीच अग्रेसर असतो. त्याच्या या यशात भाऊसाहेब देशमुख सार्वजनिक वाचनालय (कुकाणा), शाळेतील शिक्षक आणि पालकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# पर्यावरणाच्या संरक्षणासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा : प्रमोद मोरे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**टाकळीभान** : पर्यावरण रक्षण म्हणजे फक्त झाडे लावणे नव्हे तर प्रदूषण कमी करणे महत्वाचे आहे. पर्यावरण जागृतीसाठी प्रचार, प्रसार करतानाच पर्यावरण कार्यशाळा आयोजित करून पर्यावरण रक्षणाचे महत्त्व सर्व घटकांना पटवून देणे गरजचे आहे. निसर्ग व पर्यावरण वाचवायचे असेल सर्वांनी पर्यावरण कार्यात सहभागी व्हावे. पर्यावरणाचे कार्य जागतिक स्वरापर्यंत पोहोचविण्यासाठी पर्यावरण प्रेमींनी पुढाकार घ्यावा,असे आवाहन निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी केले.अहिल्यानगर येथे पार पडलेल्या निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या बैठकीत मोरे बोलत होते.

अध्यक्षस्थानी ॲड. सुरेश लगड होते. बैठकीस जिल्ह्यातील अनेक पर्यावरण प्रेमींची उपस्थिती होती. पर्यावरण मंडळाच्या नूतन पदाधिकाऱ्यांची या वेळी निवड करण्यात आली. राज्यात पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सन्मान करण्यात आला. ॲड. सुरेश लगड म्हणाले की, पर्यावरण हेच आपले जीवन आहे. समाजातील प्रत्येक घटकांनी पर्यावरणाच्या कामात सहभागी व्हावे, पर्यावरणासंदर्भात लागणारी मदत व मार्गदर्शनाला मी सदैव तत्पर राहील. मंडळाच्या राज्य कार्याध्यक्षा छायाताई राजपूत, जिल्हाध्यक्षा लतिकाताई पवार यांनी निसर्ग व पर्यावरण रक्षणाबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष तुकाराम अडसूळ, संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख महेश पाडेकर, सचिव डॉ. अनिल लोखंडे, सुभाष वाखारे, सहसचिव संजय गायकवाड, कार्याध्यक्ष प्रमोद काकडे, आदर्श सरपंच बाळासाहेब ढोले, ग्राम विकास अधिकारी व इतर उपस्थित होते. सूत्रसंचालन संजय गायकवाड यांनी केले. डॉ. अनिल लोखंडे यांनी आभार मानले.

# ग्रामीण रुग्णालयात एचपीव्ही लसीकरण अभियानाचा शुभारंभ



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या वतीने १४ ते १५ वयोगटातील मुलींसाठी राबविण्यात येणाऱ्या एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण अभियानाचा शुभारंभ सोमवारी (दि.९) नेवासा ग्रामीण रुग्णालयात करण्यात आला. गर्भाशयमुख कर्करोगापासून मुलींचे संरक्षण करण्यासाठी हे लसीकरण अत्यंत महत्त्वाचे असून पालकांनी आपल्या मुलींच्या सुरक्षेसाठी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन नेवासा नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील यांनी केले.

> एचपीव्ही लसीकरणाबाबत सोशल मीडियावर पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये. मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने हे लसीकरण अत्यंत महत्त्वाचे असून पालकांनी पुढाकार घेऊन आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामेश्वर काटे यांनी केले.

या ९० दिवस चालणाऱ्या अभियानाचा प्रारंभ धन्वंतरी मूर्तीचे पूजन करून करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. करणसिंह घुले पाटील होते. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामेश्वर काटे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भागवत दहिफळे, डॉ. बाळासाहेब राऊत, नगरसेवक प्रविण सरोदे, नगरसेवक महेश लोखंडे, डॉ. मोहसीन बागवान, डॉ. दीपक डिंबर, डॉ. मोहळकर, स्टाफ इंचार्ज शिलाताई सुखदान व शिक्षक ज्ञानेश्वर काळे आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. रामेश्वर काटे यांनी सांगितले की, ९ मार्चपासून दररोज सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत लसीकरण केले जाणार आहे.

सोशल मीडियावर पसरत असलेल्या अफवांवर विश्वास न ठेवता पालकांनी आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भागवत दहिफळे यांनी सांगितले की, नेवासा तालुक्यात या अभियानाअंतर्गत ९० दिवसांत सुमारे ३५०० मुलींना लस देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या वेळी इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी ज्योती सुरजित शर्मा हिला पहिली लाभार्थी म्हणून प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समुपदेशक अविनाश गायकवाड यांनी केले, तर आभार डॉ. भागवत दहिफळे यांनी मानले.

# हनुमंतगावच्या बटरफ्लाय प्री स्कूल तर्फे महिला दिन उत्साहात



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : यशवंत प्रतिष्ठान आयोजित हनुमंतगाव येथील बटरफ्लाय प्री स्कूल तर्फे कृषी भूषण ॲग्रो टुरिझम चंद्रपूर चिकूची वाडी येथे महिला दिन उत्साहात साजरा झाला. यावेळी कोल्हार येथील प्रसिद्ध डॉक्टर ऐश्वर्या अजित मोरे (एमडी आयुर्वेद) या प्रमुख पाहुणे म्हणून लाभल्या. महिलांचे आरोग्य समस्या यासंबंधी आपले शरीर आपल्याला संकेत देत असते हे संकेत लक्षात घेऊन स्त्रियांनी स्वतःची वेळीच काळजी घेणे किती आवश्यक आहे तसेच महिलांच्या सौंदर्य त्यांचे डायट व योगाचे महत्त्व त्यांनी अनेक उदाहरणे देऊन अत्यंत सोप्या शब्दात सर्वांना समजेल अशा प्रकारे महिलांच्या आरोग्याबद्दल मौल्यवान असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ महिला नंदाताई ब्राह्मणे होत्या. शाळेच्या मुख्याध्यापिका राजश्री बुचुडे यांनी प्रमुख पाहुण्यांसह सर्वांचा सत्कार केला व महिलांच्या कर्तुत्वाचा व समर्पणाचा गौरव केला. कार्यक्रम हा पूर्ण दिवसभर चालला. सहशिक्षिका मोनिका व अबोली यांनी कार्यक्रम सुरळीत पार पाडला.

**Change Of Name**

Old name: **LATIFKHA SHAHEBKHA PATHAN** is on my PASSPORT. and My New Name is **LATIB SAHEBKHA PATHAN** as on Aadhar Card Number is 5852 9890 5711 (09/03/2026)

# नेवासा धार्मिक स्थळांच्या विकासासाठी आर्थिक तरतूद करा

## खा. वाकचौरे यांची केंद्रीय पर्यटन मंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा हे अत्यंत महत्त्वाचे धार्मिक तीर्थक्षेत्र आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांची कर्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पवित्र स्थळीच ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी या महान ग्रंथाची रचना केली होती. तसेच येथे असलेले मोहिनीराज मंदिर हे भगवान विष्णूच्या मोहिनी अवताराशी संबंधित प्रसिद्ध मंदिर असून दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात.

नेवासा व रामायणकालीन स्थळांच्या विकासासाठी आर्थिक तरतूद करण्यात यावी अशी मागणी खा.भाऊसाहेब वाकचौरे यांनी केंद्रीय पर्यटन मंत्र्यांकडे पत्राद्वारे केली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील ऐतिहासिक व धार्मिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या नेवासा तसेच रामायणकालीन स्थळांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित आधुनिक डिजिटल संग्रहालय उभारण्यासाठी विशेष आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी खा. वाकचौरे पत्र देऊन तसेच लोकसभेत तारांकित प्रश्न उचलून यांनी केली आहे.



या सर्व स्थळांचे भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागामार्फत पुरातत्त्वीय सर्वेक्षण करून त्यांना नाशिक (पंचवटी) सोबत जोडत रामायण सर्किटमध्ये समाविष्ट करावे, अशी मागणीही खासदार वाकचौरे यांनी केली आहे. नेवासा तीर्थक्षेत्राच्या विकासाबाबतच्या वाकचौरे यांच्या तारांकित प्रश्नावर उत्तर देतांना केन्द्रीय पर्यटन मंत्री गजेन्द्र शेखावत यांनी सांगितले, अहिल्यानगर येथील नेवासा परिसरातील लाडमोड टेकडी जेथे संत ज्ञानेश्वर महाराजांनी श्रीमद भगवत गीतेवर प्रसिध्द प्रवचन दिले होते. या स्थळाला भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाकडून पुरातत्व स्थळ व अवशेष अधिनियम १९५८ अंतर्गत संरक्षित करण्यात आले आहे. राज्यातील तीर्थक्षेत्रांचा पर्यटन विकास व देखभालीची मुख्य जबाबदारी संबंधित राज्य सरकाराची असली तरी केन्द्र सरकार विविध योजनांच्या माध्यमातून राज्य सरकारांना पर्यटन विकासासाठी सहकार्य करत असल्याचे ही मंत्री शेखावत यांनी स्पष्ट केले.

> या स्थळांच्या देखभालीसाठी करण्यात आलेला मागील तीन वर्षातील खर्च वर्ष २०२२-२३ साठी रु. ६,३५,४१२, वर्ष २०२३-२४ साठी रु. ३,२१,२६८,वर्ष २०२४-२५ साठी रु. २,५९,४९२ तर वर्ष २०२५ ते जानेवारी २०२६ पर्यंत २,९०,४१४ इतका खर्च करुन या स्थळांचे जतन करण्यात येते.
> **गजेन्द्र शेखावत, केंद्रीय पर्यटन मंत्री**

महाराष्ट्र सरकार कडून नेवासा तीर्थक्षेत्राच्या पर्यटन विकासासाठी केन्द्र सरकारकडे अद्याप कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही मात्र महाराष्ट्र राज्यातील विविध पर्यटन विकास प्रकल्पासाठी केन्द्र सरकारने सुमारे रु. ४३७.१० कोटीची मंजूरी दिली आहे.

**Change Of Name**

I Have Change My Old Name **Shafik Usman Shaikh Shaikh Shafique Usman** ( Education Documents ) ( Before Name ) To New Name As **Shafik Usman Kakar** (Aadhar No. 9902 5769 6104) From Vide Affidavit Before Notary Public Shrirampur Place: Shrirampur Date : 08/03/2026

**Change Of Name**

Old name: is on my **SHAKH HABIB SHAIKH YUSUF** IS ON MY SCHOOL LIVING CERTIFICATE. and My New Name is **HABIB YUSUF SHAIKH** as on Aadhar Card Number is 2896 3064 9157 (09/03/2026)

## जाहीर समन्स

प्रो.फि. /- ॲड. एस.वी.गरड
निशाणी नंबर : ४१ ॲडव्होकेट, नेवासा कोर्ट,
नेमलेली तारीख : २०/०४/२०२६

सह. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ. स्तर नेवासा, कोर्ट नं.२
यांचे कोर्टात रे.मु.नं. ४९८/२०२३

**वादी** - दिनकर साहेबराव दाभाडे
**प्रतिवादी** - दत्तात्रय देवराव दाभाडे, वगैरे

ज्याअर्थी वादी यांनी प्रतिवादींविरूध्द मौजे अंतरवाली, ता. नेवासा येथील गट नं.१२६/१/१, क्षेत्र ० हे. ४० आर क्षेत्राबाबत खरेदी करारनाम्यावरुन स्पेसिफिक पॅरफॉर्मन्सचा दावा दाखल केलेला असून सदर दाव्यात प्र.वादी नं.४ड यांना वेळोवेळी मे. कोर्टामार्फत समन्स/नोटीस काढून देखील बजावणी होत नाही. म्हणुन मा. न्यायालयाने प्र.वादी नं.४ड शैला शिवनाथ लिपने हिच्यासाठी वृत्तपत्रामध्ये जाहीर समन्स काढण्याचा आदेश केलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्र.वादी नं.४ड शैला शिवनाथ लिपने यांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन एक महिन्याचे आत अथवा सदर दाव्याची नेमलेली तारीख २०/०४/२०२६ रोजी म्हणणे देण्यासाठी आपण स्वतः अथवा आपले वकिलामार्फत या न्यायालयात उपस्थित राहावे. आपण वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुउपस्थितीत सदर दाव्याची सुनावणी केली जाईल व त्याचा निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी. आज दि.२४/०२/२०२६ रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा
दिनांक:-२४/०२/२०२६

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय,**
**क. स्तर नेवासा**

शिक्का

**हुकूमावरुन**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर नेवासा**